किसान शिक्षण संस्था , वाळवा

# क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा .

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

आणि

**शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर**

यांच्या संयुक्त विद्यमाने

One Day International Conference

On

## Recent Trends and Challenges in Social Sciences and Languages

बुधवार दिनांक : १२/०३/२०२५

# अहवाल

प्रा. डॉ. कृष्णत राजाराम जाधव — प्रा. डॉ. सुषमा अरुण नायकवडी

समन्वयक — प्राचार्य

प्रा. सतीश यशवंत चौगुले — प्रा. डॉ. जनार्दन पांडू कांबळे

# परिषद अहवाल

**परिषद शिर्षक:** One Day International Conference on Recent Trends and Challenges in Social Sciences and Languages

आयोजक : क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा ता. वाळवा जि. सांगली

परिषद दिनांक : १२/०३/२०२५

परिषद स्थळ: पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी स्मारक, वाळवा

---

**प्रस्तावना :**

क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय , वाळवा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या सहकार्याने One Day International Conference on Recent Trends and Challenges in Social Sciences and Languages आयोजित करण्यासंदर्भात प्रस्ताव विद्यापीठाकडे दिलेला होता. त्यानुसार विद्यापीठाने आमच्या महाविद्यालयास या परिषदेचे आयोजन करण्याची परवानगी SU/Seminar/593 Date: 20th Feb. 2025 च्या संदर्भ पत्राने देण्यात आलेली होती. त्यानुसार सदरच्या परिषदेचे आयोजन बुधवार दिनांक : १२/०३/२०२५ रोजी करण्यात आलेली होते. सदरची परिषद हि नियोजित दिवशी व वेळेनुसार संपन्न झाली. या परिषदेचा अहवाल पुढीलप्रमाणे:

- **परिषदेची उद्दिष्ट्ये :**

1. सामाजिक शास्त्रांमधील नवीन संशोधन व त्याचा समाजावर होणारा परिणाम यावर चर्चा करणे.
2. भाषाशास्त्रातील आधुनिक प्रवृत्ती आणि तंत्रज्ञानामुळे होणारे बदल समजून घेणे.
3. सामाजिक आणि भाषिक क्षेत्रातील आव्हाने ओळखून त्यावर उपाय शोधणे.
4. नव्या पिढीसाठी संशोधन आणि शैक्षणिक धोरणांमध्ये सुधारणा सुचवणे.

- **परिषदेसाठी नाव नोंदणी :**

सदरच्या परिषदेसाठी माहितीपत्रक पोष्टाने, ई मेल व व्हाटस अप ग्रुप व वैयक्तिक स्वरूपात भारतातील विविध राज्यातील महाविद्यालये , संशोधन संस्था यांना तर परदेशातील व्यक्ती यांना पाठविण्यात आले होते. सोशल मिडियाच्या माध्यमातून प्राध्यापक यांना सहभागी होण्यासंदर्भात आवाहन केलेले होते. याशिवाय संयोजनाच्या सोयीसाठी गुगल फॉर्मच्या माध्यमातून परिषदेसाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. प्रत्यक्ष परिषदेच्या दिवशी स्पॉट रजिस्ट्रेशनची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली होती. या सर्व प्रयत्नामुळे या कार्यशाळेसाठी १६० प्राध्यापक, संशोधन विद्यार्थी व व्यक्ती कार्यशाळेसाठी सहभागी झालेले होते.

- **बीजभाषक व तज्ञ साधन व्यक्ती :**

सदर परिषदेच्या संयोजनासाठी निर्माण करण्यात आलेल्या संयोजन समितीची मा. प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली बिजभाषक आणि साधनव्यक्ती निश्चितीसाठी मिटिंग घेण्यात आली. सदरच्या मिटींगमध्ये बिजभाषक म्हणून प्रो. मा. गोपाळ गुरु सर (संपादक , ई.पी.डब्ल्यू , दिल्ली ) यांचे नाव निश्चित करण्यात आले. याशिवाय विविध विषयावर साधनव्यक्ती म्हणून मा. प्रो. जगन कराडे समाजशास्त्र विभाग , व प्रा. डॉ. मीना पोतदार , भूगोल विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांना निमंत्रित करण्याचे ठरले. याशिवाय मॉरीशस येथील सेवानिवृत्त प्राध्यापक मा. होमराजन गोव्रींया महात्मा गांधी संस्था मोका (मॉरिसशस ) यांना निमंत्रित करण्याचे निश्चित केले. उदघाटन सत्रासाठी मा, डॉ. पी.एस. पाटील प्र कुलगुरू , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर यांना प्रमुख पाहुणे तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. वैभव काका नायकवडी अध्यक्ष , किसान शिक्षण संस्था, वाळवा यांना निमंत्रित करण्याचे निश्चित केले. या सर्व सन्माननीय बिजभाषक , साधनव्यक्ती, अध्यक्ष यांना निमंत्रण पत्रे पाठविण्यात आली.

- **तांत्रिक तयारी :**

परिषदेच्या यशस्वी संयोजनासाठी महाविद्यालयाच्या कार्यकुशल प्राचार्या डॉ. सुषमा अरुण नायकवडी यांनी स्टेज, सूत्रसंचालन , तांत्रिक समिती, नाव नोंदणी , प्रमाणपत्र वितरण , चहा , नाश्ता व भोजन, रिसर्च पेपर पब्लिकेशन , वाचन अशा स्वरूपाच्या समिती तयार करून त्यांचा वेळोवेळी आढावा घेतला जात होता. प्रमाणपत्र वितरण समितीने आवश्यक तेवढी प्रमाणपत्रांची छपाई करून घेतलेली होती. तर इतर सर्व समिती प्रमुख व सदस्य यांनी आवश्यक ती तयारी केलेली होती.

❖ **उदघाटन**:

सदरच्या परिषदेचे उदघाटन शिवाजी विद्यापीठ कोल्हापुरचे प्र-कुलगुरू मा. डॉ.पी.एस. पाटील सर यांच्या हस्ते झाले. उद्याचा सक्षम तरुण घडविण्यासाठी उच्च शिक्षणातून विकासाची कास धरणारा विद्यार्थी निर्माण करणे हे फार मोठे आव्हान असून भविष्यकाळात ज्ञानाचा एकमेव स्त्रोत म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता याकडे पाहिले जाते. विद्यार्थ्यानी मनोरंजनासाठी इंटरनेटचा वापर करण्यापेक्षा व्यक्तिमत्व विकासासाठी त्याचा वापर करणे आवश्यक आहे. सामाजिक शास्त्राच्या संशोधनासाठी महाविद्यालयाने कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगशाळा स्थापन करावी त्यासाठी शिवाजी विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करेल असे मत व्यक्त केले.

या उदघाटन सत्राचे अध्यक्ष मा. वैभव काका नायकवडी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना समाजातील सर्वच प्रश्न सामाजिक शास्त्राशी निगडीत आहेत. त्यामुळे संशोधकांनी समाजात मिसळून समाजाचे प्रश्न समजावून घेऊन संशोधनाच्या माध्यमातून त्यावर उपाय शोधण्याचे प्रयत्न करावेत. त्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा निश्चितच उपयोगी ठरू शकतील असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य मा.डॉ. व्ही.एम. पाटील, सातारा इतिहास संशोधन मंडळाचे अध्यक्ष व छत्रपती शिवाजी कॉलेज साताराचे प्राचार्य मा. डॉ. राजेंद्र मोरे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. सुषमा अरुण नायकवडी यांनी केले तर प्रा. डॉ. जाधव के. आर. यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. जे.पी.कांबळे यांनी केले.

❖ **बीजभाषण**

बीज भाषणाच्या सत्रामध्ये माननीय प्रोफेसर डॉक्टर गोपाळ गुरु सर यांनी पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या सामाजिक कार्याच्या आठवणी सांगितल्या. याशिवाय संशोधक विद्यार्थी प्राध्यापक यांना संशोधनात जिवंतपणा आणायचा असेल तर संशोधनाच्या केंद्रस्थानी माणूस असला पाहिजे हा महत्त्वाचा सल्ला दिला. समकालीन समस्यांचा अभ्यास हा सामाजिक शास्त्राच्या संशोधनासाठी महत्त्वाचा आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. या बीज भाषण सत्राचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुषमा नायकवडी यांनी सध्याच्या सामाजिक समस्या व त्यावरील उपाययोजना करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर संशोधकांनी करावा असे मत व्यक्त केले.

❖ **मुख्य मार्गदर्शन सत्रे:**

**सत्र : १**

परिषदेच्या प्रथम सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर समाजशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. जगन कराडे यांनी सध्याच्या सामाजिक समस्या आणि त्यावर होणारे संशोधन विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वाचे ठरत आहेत. समाजाच्या प्रगतीसाठी या समस्या ओळखून त्यावर उपाय शोधणे गरजेचे आहे. सामाजिक समस्या सोडवण्यासाठी सरकार, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. संशोधनाच्या मदतीने नवकल्पनांची अंमलबजावणी केल्यास या समस्यांवर उपाय मिळू शकतो. बेरोजगारी आणि अर्थव्यवस्था याशिवाय शिक्षण प्रणालीतील सध्याची आव्हाने, महिला सशक्तीकरण व लैंगिक समानता, पर्यावरण आणि हवामानातील बदल व सामाजिक विषमता आणि जातिभेद या विषयावर संशोधकांनी जास्तीत जास्त संशोधन करावे असे आव्हान केले.

या सत्राचे अध्यक्ष मा. प्रा. भारतभूषण माळी यांनी कोरोना महामारी नंतर संशोधन क्षेत्रात झालेल्या बदलांचा आढावा घेतला.

**सत्र: २**

परिषदेच्या दुसऱ्या सत्रामध्ये मा. प्रा. डॉ. मीना पोतदार, भूगोल विभाग शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर यांनी आधुनिक कालखंडातील संशोधनाचे कल आणि समस्या यावर आपले विचार व्यक्त केले. त्यांनी आधुनिक कालखंडात संशोधन करत असताना संशोधनाचा विषय निश्चित करताना समाजातील वास्तव समस्या विचारात घ्याव्यात. या समस्येचे निराकरण करण्यासाठी आवश्यक ती आधुनिक तंत्रे वापरावीत. संशोधन करताना वास्तवतेचा विचार करावा. संशोधनासाठी शास्त्रीय स्वरूपाची संशोधन पद्धती अंमलात आणणे आवश्यक आहे. संशोधनात आधुनिकतेचा वापर केल्यास अचूक संशोधन होण्यास मदत होते असे मत व्यक्त केले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून शिवाजी विद्यापीठ भूगर्भ शास्त्र व भूगोलशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. बी एस जाधव हे होते. सध्याच्या सामाजिक समस्या आणि त्यावर होणारे संशोधन विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वाचे ठरत आहे. समाजाच्या प्रगतीसाठी या समस्या ओळखून त्यावर उपाय शोधणे गरजेचे आहे. त्यांनी संशोधनातील आधुनिक कालखंडात येणाऱ्या समस्या व त्यावर संशोधकांनी कशाप्रकारे मात करावी याबद्दल मार्गदर्शन केले.

सत्र: ३

परिषदेच्या तिसऱ्या सत्रात ऑनलाईन प्रणाली द्वारे मॉरिशस येथील मॉरिशस येथील प्रसिद्ध भाषा अभ्यासक माननीय डॉक्टर होम राजन यांनी मॉरिशस मधील मराठी भाषेचा इतिहास आणि मॉरिशसच्या इतिहासातील मराठी भाषेचे टप्पे सविस्तरपणे स्पष्ट केले. मानवी जीवन आणि काळ याचा खूप जवळचा संबंध आहे. प्रत्येक काळाचा परिणाम मानवी जीवन व्यवस्थेवर अपरिहार्यपणे होत असतो .मानवाच्या उत्क्रांतीपासून आजपर्यंतचा इतिहास पाहता, उपरोक्त विधानाला बळकटी मिळते. एकूण मानवी जीवनाचा अभ्यास कालिकदृष्टिकोनातून करायचे झाल्यास ,प्राचीन काळ ,मध्ययुगीन काळ आणि आधुनिक काळ असा करावा लागेल . पण सध्या प्राचीन आणि मध्ययुगीन काळाचा विचार करण्याची गरज नाही.

साधारणतः युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि त्या औद्योगिक क्रांतीनंतर आधुनिक काळाला सुरुवात झाली असे म्हणता येईल. आधुनिक काळातूनच स्वच्छंदवाद ,वास्तवात ,अतिवास्तवात, देशीवाद असे वेगवेगळे प्रवाह निर्माण होत गेले. हे प्रवाह म्हणजे विचार प्रवाह .या विचार प्रवाहांचा आधुनिक काळामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर मानवी जीवनावर आणि साहित्य निर्मिती आणि कलानिर्मितीवर परिणाम झाला आहे. आणि ,त्या त्या काळानुरूप त्या त्या पद्धतीने जीवनमूल्य तयार झाली आहेत. आणि, त्यातूनच साहित्य निर्मिती सुद्धा होत गेली आहे . आधुनिक काळामध्ये प्रामुख्याने 19 वे शतक हे सुधारणावादी विचारसरणीचे शतक असे आपल्याला पाहायला मिळते . युरोपमध्ये रेनांसंन चळवळ झाली आणि त्यातून भारतामध्ये सुधारणावादी चळवळी आल्या. या चळवळीच्या माध्यमातून स्वातंत्र्य समता, बंधुता ,स्त्री-पुरुष समानता, अंधश्रद्धा निर्मूलन यासारख्या नव्या गोष्टी येऊ लागल्या आणि त्याच पद्धतीने भारतातही साहित्य निर्मिती झालेली आपल्याला पाहायला मिळते. यामध्ये प्रामुख्याने महात्मा फुले, आगरकर या लोकांचे योगदान खूप मोठी आहे. त्यानंतर भारतीय परिपेक्षा मध्ये, स्वातंत्र्य चळवळीचा खूप मोठा प्रभाव आपल्याला पाहायला मिळतो .या चळवळीतून प्रखर राष्ट्रनिष्ठा ,एकात्मभाव ,नव्या राष्ट्रवादाची संकल्पना, यासारख्या गोष्टी पुढे आल्या. राष्ट्रीय चळवळीचा विचार करणारी एक पिढीच या काळात ,भारतात निर्माण झाली. असे मत होम राजन यांनी व्यक्त केले.

या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. अनिल काटे यांनी या समकाळात एक वेगळीच नवी मूल्य व्यवस्था निर्माण झाली आहे. या काळात जागतिकीकरणामुळे देशाच्या सीमा गळून पडलेल्या आहेत. आज जगातील कोणतेही शहर त्याचे स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवलेले नाही . उदाहरणार्थ न्यूयॉर्क, लंडन, पॅरिस ,मुंबई ,चेन्नई ,बेंगलोर हे एक सारखे झाले आहेत . प्रत्येक देशाची संस्कृती आता हळूहळू गळून पडू लागली आहे. आणि वैश्विक एकच संस्कृती निर्माण झाली आहे असे मत व्यक्त केले.

❖ **संशोधन पेपर वाचन :**

या परिषदेमध्ये सामाजिक शास्त्रे आणि भाषा आधुनिक कालखंडातील प्रवाह आणि आव्हाने या विषयावर ९५ पेक्षा जास्त संशोधन पेपर आलेले होते. या सर्व पेपरचे वाचन संशोधक यांनी दोन सत्रात दोन विविध ठिकाणी सादर केले.

❖ **समारोप :**

सदरच्या कार्यशाळेचा समारोप महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. सुषमा अरुण नायकवडी यांच्या अध्यक्षतेखाली मा. एन.एस. पाटील , समन्वयक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष , प्रा. डॉ. जाधव के.आर. , प्रा. एस.वाय. चौगुले, प्रा.डॉ. जे.पी. कांबळे, प्रा. डॉ. बी.एस. माळी, प्रा.डॉ. एच.जी. वलांडकर, प्रा. जी.एन. ढोबळे , प्रा. आकाश जाधव आणि प्रा. अशोक पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. जाधव के.आर. यांनी केले. सहभागी संशोधक यांच्या वतीने प्रा. डॉ. आर.बी. पाटील, प्रा. डॉ. अनिल काटे आणि कु. राजश्री जगताप यांनी आपली कार्यशाळेसंबंधीची मते व्यक्त केली. सर्व वक्ते यांनी कार्यशाळेची उपयुक्तता स्पष्ट करीत असताना शैक्षणिक

क्षेत्रातील आधुनिक प्रवाह यावर विचारमंथन होण्यासाठी वारंवार अशा प्रकारच्या चर्चेचे आयोजन करावे अशी अपेक्षा व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मा. प्राचार्य डॉ. सुषमा नायकवडी म्हणाल्या कि पर्यावरणवादी विचारसरणीतूनच या पृथ्वीवर माणसाचे अस्तित्व कायमस्वरूपी टिकून ठेवायचं असेल तर काय केले पाहिजे यासंदर्भामध्ये चर्चा सुरू झाली आहे .जगभरातले सगळे शास्त्रज्ञ, विचारवंत या एकाच गोष्टीवर अभ्यास करायला लागलेले आहेत .सध्याच्या समकाळात पर्यावरण रक्षण हे एक आव्हान बनून गेले आहे. त्यातून पर्यावरणवादी जीवनशैली विकसित होऊ लागली आहे . शाश्वत विकास नावाची नवी एक विचारसरणी दृढ होऊ लागली आहे .अलीकडच्या कालखंडामध्ये संपूर्ण जगामध्ये शाश्वत विकास आणि पर्यावरणवादी साहित्य निर्माण होऊ लागले आहे. यातूनच पर्यावरणवादी समीक्षा पद्धती ही पुढे येऊ लागली आहे . शेवटी आभार प्रा. सतीश चौगुले यांनी व्यक्त केले. सूत्र संचलन प्रा. श्रीधर कांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे हि परिषद यशस्वीपणे पार पडली. या सहकार्यामुळे संशोधकांना आपले विचार व्यक्त करण्यासाठी एक प्रभावी मंच उपलब्ध झाला. विद्यापीठाच्या पाठबळामुळेच हि परिषद उच्च शैक्षणिक स्तरावर आयोजित करता आली. परिषद यशस्वी करण्यासाठी दिलेल्या आर्थिक सहकार्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाचे संयोजन समिती आणि आमचे महाविद्यालय आभार व्यक्त करत आहे.

KRANTISINH NANA PATIL COLLEGE DIST. SANGLI ESTA. 1962 WALWE

PRINCIPAL,
KRANTISINH NANA PATIL COLLEGE
WALWE, DIST. SANGLI.

**डॉ.नायकवडी सुषमा अरुण**

प्राचार्य



उदघाटन प्रसंगी विचार व्यक्त करताना मा. डॉ. पी.एस. पाटील – प्र-कुलगुरू शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर




उदघाटन प्रसंगी अध्यक्षीय मनोगत  व्यक्त करताना मा. वैभव काका नायकवडी
अध्यक्ष , किसान शिक्षण संस्था वाळवा



बिजभाषक म्हणून विचार मांडताना मा. डॉ. गोपाळ गुरु – संपादक ई. पी. डब्ल्यू , दिल्ली



साधन व्यक्ती - मा. डॉ. जगन कराडे – समाजशास्त्र विभाग , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर



साधन व्यक्ती - मा. डॉ. मीना पोतदार – भूगोल विभाग , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर






| | |
|---|---|
| साधनव्यक्ती मार्गदर्शन –<br>मा. डॉ. होम राजन (मॉरिशस ) | समारोप समारंभ – अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना<br>मा. प्राचार्या – डॉ. सुषमा अरुण नायकवडी |



**संशोधन पेपर वाचन**

सकाळ

# भविष्यात ज्ञानाचा स्त्रोत कृत्रिम बुद्धिमत्ताच

## प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील : वाळव्यात आंतरराष्ट्रीय परिषद

आष्टा, ता. १५ : ''भविष्यकाळातील ज्ञानाचा महत्त्वाचा स्रोत हा कृत्रिम बुद्धिमत्ताच असेल,'' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. वाळवा येथे क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयाने आयोजित केलेल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून केले.



वाळवा : परिषदेत बोलताना डॉ. पी. एस. पाटील. समवेत वैभव नायकवडी, डॉ. सुषमा नायकवडी व पदाधिकारी.

डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, ''उद्याचा सक्षम तरुण घडवण्यासाठी या आंतरराष्ट्रीय परिषदेचा उपयोग झाला पाहिजे. उच्च शिक्षणातून विकासाची कास धरणारा विद्यार्थी निर्माण करणे, हे फार मोठे आव्हान आहे. भविष्यकाळात ज्ञानाचा एकमेव स्रोत म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच ए.आय.कडे पाहिले जात आहे. विद्यार्थ्यांनी मनोरंजनासाठी इंटरनेट वापरण्यापेक्षा व्यक्तिमत्त्व विकासासाठी इंटरनेटचा उपयोग करावा. ए. आय. वापरण्याआधी विद्यार्थ्यांनी ज्ञानाने समृद्ध होणे आवश्यक आहे.'' या परिषदेमध्ये डॉ. गोपाळ गुरू यांनी बीजभाषण केले. त्यांच्या बीज भाषणातून त्यांनी पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी यांच्या आठवणी सांगितल्या. तसेच संशोधक विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना संशोधनात जिवंतपणा आणायचा असेल तर संशोधनाच्या केंद्रस्थानी माणूस असला पाहिजे, हा महत्त्वाचा सल्ला दिला. परिषदेचे अध्यक्ष वैभव नायकवडी यांनी समाजातले सर्वच विषय सामाजिक शास्त्राशी निगडित आहेत.

प्राचार्या डॉ. सुषमा नायकवडी यांनी प्रास्ताविकात महाविद्यालय उभारणीचा इतिहास आणि बदललेली शैक्षणिक आव्हाने याची माहिती दिली. विविध सत्रांमध्ये डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. राजेंद्र मोरे, डॉ. जगन कराडे, डॉ. मीना पोतदार, डॉ. बी. एस. जाधव, डॉ. अनिल काटे यांनी मार्गदर्शन केले. तसेच या परिषदेसाठी खास मॉरिशिसमधून डॉ. होमराजन ओस्क यांनी 'ऑनलाइन' संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक यांच्याशी संवाद साधून मार्गदर्शन केले. या परिषदेमध्ये देशभरातील १५० संशोधकांनी सहभाग घेतला होता. डॉ. के. आर. जाधव व सहकाऱ्यांनी संयोजन केले. डॉ. जे. पी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

Sangli, Main
16/03/2025 Page No. 5

# भविष्यातील ज्ञानाचा स्रोत कृत्रिम बुद्धिमत्ताच असेल : पी. एस. पाटील

जनप्रवास । वाळवा

भविष्यकाळातील ज्ञानाचा महत्त्वाचा स्रोत हा कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय) च असेल असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले, वाळवा येथे क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयाने आयोजित केलेल्या एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



प्रास्ताविक क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुषमा नायकवडी यांनी केले, त्यांनी कॉलेज उभारणीचा इतिहास आणि बदललेली शैक्षणिक आव्हाने याची माहिती दिली. प्र. कुलगुरू डॉ पी. एस. पाटील म्हणाले, उद्याचा सक्षम तरुण घडवण्यासाठी या आंतरराष्ट्रीय परिषदेचा उपयोग झाला पाहिजे. उच्च शिक्षणातून विकासाची कास धरणारा विद्यार्थी निर्माण करणे हे फार मोठे आव्हान आहे भविष्यकाळात ज्ञानाचा एकमेव स्रोत म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय) कडे पाहिले जाते.

विद्यार्थ्यांनी मनोरंजनासाठी इंटरनेट वापरण्यापेक्षा व्यक्तिमत्त्व विकासासाठी इंटरनेटचा उपयोग करावा. कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय) जरी ज्ञानाचा स्रोत असला तरीसुद्धा ए.आय वापरण्याआधी विद्यार्थ्यांनी ज्ञानाने समृद्ध होणे गरजेचे आहे. सामाजिक शास्त्राच्या संशोधनासाठी महाविद्यालयाने कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय) लॅब स्थापन करावी, त्यासाठी विद्यापीठाकडून सहकार्य केले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

वैभव नायकवडी, डॉ. गोपाळ गुरु उपस्थित होते. या परिषदेमध्ये जवळजवळ दीडशे संशोधकांनी सहभाग घेतला होता. सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, मुंबई, दिल्ली मॉरिशियस अशा विविध ठिकाणाहून संशोधक या परिषदेमध्ये सहभागी झाले होते. विविध सत्रांमध्ये अनेक प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले, तसेच या परिषदेसाठी खास मॉरिशियस मधून डॉ. होमराजन ओमक यांनी ऑनलाइन स्वरूपात संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक यांच्याशी संवाद साधून मार्गदर्शन केले.

---

# क्रांतिसिंह पाटील महविद्यालयातर्फे आज परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाळवा :** येथील क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयातर्फे बुधवारी (दि.१२) विविध भाषा आणि सामाजिक शास्त्रांची आंतरराष्ट्रीय परिषद होत आहे. यासाठी देश-विदेशांतील अनेक नामवंत संशोधक उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. सुषमा नायकवडी यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

याचे उद्घाटन डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. परिषदेत बीजभाषक म्हणून गोपाळ गुरू (नवी दिल्ली) हे मार्गदर्शन करणार आहेत तर उद्घाटन सत्रासाठी वैभव नायकवडी अध्यक्ष आहेत. दुसऱ्या सत्रात मॉरिशस येथील संशोधक डॉ. होम राजन हे मार्गदर्शन करणार आहेत तर मीना पोतदार यांचे मार्गदर्शन होणार आहे. परिषदेत देश-विदेशांतून सुमारे दोनशे शोधनिबंध प्रकाशित होणार आहेत. परिषद यशस्वी करण्यासाठी सुषमा नायकवडी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापक व कर्मचारी काम करत आहेत.